**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की ,**

माझे नाव – संतोष रविंद्र तारी , वय – ३५ वर्षे,

व्यवसाय – हॉटेल व्यवसाय

रा. – देवगड, ता. देवगड

**शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे प्र. सहा.सरकारी अभियोक्ता श्री. ए.ए.गुमास्ते यांचे मार्फत.**

०१. मला दि.८/०७/२०२३ रोजी दुपारी १२ च्या दरम्यान पोलिसांनी पंचनाम्यासाठी बोलवले होते. माझ्या सोबत दुसरे पंच तेजस घाडी हे होते. त्या ठिकाणी एस.टी. चाअपघात झाला होता व एक दुचाकी होती. एस.टी. चा नं.एम.एच. २०–बी.एल. – ४०७८ असा होता. दुचाकी चा क्र.एम.एच –०७–९०९१ असा होता. एस.टी. बस रस्त्याच्या पुर्ण उजव्या साईडला होती. उजव्या साईडला दुकाने होती,त्या दुकानाच्या शेडमध्ये बस शिरलेली होती. दुचाकी गाडी बसच्या खाली होती. शेडचे नुकसान झालेले होते. माझ्या समक्ष पंचनामा तयार केला. पोलिसांनी मी सांगितल्याप्रमाणे पंचनामा तयार केला. घटनास्थळ जामसंडे, दिर्बादेवी स्टॉपवर होते. बस नांदगाव बाजूकडे तोंड करुन उभी होती. आजुबाजूला दुकाने होती. मला आता पंचनामा दाखवला. तो तोच असून त्यावर माझी सही आहे. त्यावर मी पंचनामा वाचून सही केली होती. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.पी२/पीडब्ल्यू२** देण्यात येते. पोलिसांनी नकाशा काढला होता. पोलिसांनी घटनास्थळाचे फोटो काढले होते.

सरतपास पूर्ण.

मुदतीचा अर्ज आल्याने **उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब**.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–
(श्रीमती एन.बी.घाटगे)
न्यायंडाधिकारी वर्ग–१, देवगड

दि. २६/१२/२०२४